**५ जून : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त** ११ ज्येष्ठ १९२८ शके (सायं.५.३०वा.)
***विशेष लेख क्र. १७५*** गुरुवार, दि. १ जून, २००६

## पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज

***पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. पर्यावरण संतुलन बिघडू द्यायचे नसेल तर पर्यावरण संरक्षण ही एक सामाजिक चळवळ म्हणून राबविली पाहिजे आणि ती काळाची गरजही आहे.***

पर्यावरणाचे संतुलन बिघडल्यामुळे होणारे दुष्परिणाम आता प्रकर्षाने जाणवायला लागले आहेत. जागतिक पर्यावरणाचा आढावा घेतला तर, संपूर्ण जगातील वाढत्या तापमानामुळे भविष्यात अनेक आरिष्टांना तोंड द्यावे लागणार आहे, याची जाणीव झाल्याशिवाय राहात नाही. तापमान वाढल्यामुळे बर्फ वितळून समुद्राच्या पातळीत वाढ झाल्याने छोटी-छोटी बेटे आणि सखल किनारपट्टी पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. पृथ्वीचे एकूणच तापमान वाढल्यामुळे भविष्यात कोणत्या प्रकारचे धोके उद्‌भवणार आहेत, याची सामान्य माणसाला मात्र काहीही कल्पना नाही आणि चिंताही नाही. मात्र हीच मोठी चिंतेची बाब ठरणार आहे.

पर्यावरणाचे संतुलन बिघडल्यामुळे अनेक जीवजिवाणूंच्या प्रजाती नष्ट होत आहेत. नद्या, तळी तापल्यामुळे अनेक दुर्मिळ वनस्पती नष्ट होत आहेत. हवामानाचे चक्र बदलल्यामुळे पुरांची आणि दुष्काळाचीही भीती आहे. उष्ण वातावरणात जगू न शकणाऱ्या वनस्पती आणि पशुपक्षांचाही नाश होईल आणि पिके तसेच फळफळावळीवरही विपरित परिणाम होईल. वाढत्या लोकसंख्येची गरज भागविण्याकरिता धान्योत्पादनात वाढ करण्यासाठी रासायनिक खतांचा वापर आणि त्यांच्या जादा वापरामुळे जमिनीत होणारे वाढते प्रदूषण हे दृष्टचक्र सतत वाढतच जाणार आहे आणि ही परिस्थिती अशीच चालत राहिली तर भविष्यात मनुष्यप्राण्याच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होणार आहे. भविष्यकाळातला हा धोका वेळीच ओळखून त्यावर उपाययोजना केल्या नाहीत तर परिस्थिती हाताबाहेर जाण्यास फारसा वेळ लागणार नाही.

पर्यावरणाचा समतोल राखायचा असेल तर समाजातील सर्वच घटकांनी त्यासाठी प्रयत्न करायला

...२/-

हवेत. वाढते औद्योगिकीकरण आणि वाढती वाहनसंख्या यामुळे होणारे प्रदुषण रोखायला हवे. त्यावर उपाय योजायला हवेत. कार्बनच्या उत्सर्जनात कपात कशी करता येईल, यावर गांर्भीयाने विचार करुन उपाययोजना राबविणे गरजेचे आहे.

वाढती लोकसंख्या आणि वाढते शहरीकरण यामुळे वनाचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत आहे, वनसंपत्तीचा ऱ्हास होत आहे. इमारती आणि जळावू लाकडासाठी भरमसाठ जंगलतोड होत आहे. जंगलाची व्याप्ती कमी होत गेल्याने जमिनीची धूप मोठया प्रमाणात होत आहे. पावसाचे पाणी वेगाने वाहून गेल्याने जमिनीची धूप तर होत आहेच, शिवाय पाणी जमिनीत मुरण्याचे प्रमाणही कमी झाले आहे. परिणामी जमिनीतील पाण्याची पातळी खाली गेल्याने पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीसाठी पाण्याचा तुटवडा जाणवत आहे. कोरडया पडलेल्या विहिरी, शेतात पिकाचे ताट नाही, घरात अन्नाचा कण नाही, मग अशा वेळी शेतक-याने जगायचे तर कसे?

पर्यावरणाचे संतुलन बिघडू द्यायचे नसेल तर प्रत्येकाने एक तरी झाड लावलेच पाहिजे आणि ते आत्मियतेने वाढविले पाहिजे. उत्तम पर्यावरणासाठी एकूण क्षेत्राच्या किमान ३३ टक्के वनक्षेत्र असले पाहिजे. पण भारतातील हे प्रमाण अवघे १६ ते १८ टक्के आहे. महाराष्ट्रात हे प्रमाण २१ टक्के आहे. परंतु ३३ टक्क्यांपर्यंत पोहोचण्यासाठी खूप मोठी मेहनत घ्यावी लागेल. वृक्षसंवर्धनासाठी लोकचळवळ उभी करावी लागेल. लोकांमध्ये निसर्गाबद्दल जागृती निर्माण करावी लागेल. ग्रामीण जनतेच्या सहभागातून संयुक्त वनव्यवस्थापन धोरण आज राबविण्यात येत आहे. त्याची व्याप्ती वाढवावी लागेल. पडीक जमिनीवर वनीकरण करुन पर्यावरणाला मदत करावी लागेल. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाची गोडी निर्माण करण्यासाठी वन विभागामार्फत वेगवेगळया स्पर्धा घेण्यात येत आहेत. त्यांना पारितोषिकेही देण्यात येत आहेत, पण एवढयाने भागणारे नाही. मोठा पल्ला गाठायचा तर वृक्ष लागवड करणे आणि वनक्षेत्र वाढविणे हे आपल्या भावी पिढयांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी नितांत गरजेचे आहे. तरच १९७२ पासून ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्यात येतो, त्याला काहीतरी अर्थ प्राप्त होईल.

- रंगनाथ चोरमुले

----------

महाले/१ जून २००६